Topic 4

# Tribal Movement
# आदिवासी चळवळ

## (A) Tribal Problems in India - भारतातील आदिवासींच्या समस्या -

प्रस्तावना -

भारतातील आदिवासींच्या समस्या या गंभीर व जटील स्वरुपाच्या आहेत. ग्रामीण व शहरी समाजाच्या संपर्काने आदिवासी जीवनात सुधारणेचे वारे वाहू लागले आहे, परंतू त्याचबरोबर गंभीर समस्या देखील निर्माण झालेल्या आहेत. ह्या समस्यांमूळे आदिवासी समाजाचा विकास होण्यामध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत. आदिवासी समाजातील प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे....

### (1) आदिवासींच्या आर्थिक समस्या -

भारतीय आदिवासींना अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, यातील आदिवासींना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या पुढीलप्रमाणे...

#### (A) शेतीविषयक समस्या -

आजही अनेक आदिवासी लोक स्थानांतरित शेती करतात. त्यांच्या स्थानांतरीत शेतीमूळे जंगल संपत्ती नष्ट होत चालली आहे. आदिवासीकडून केली जाणारी शेती ही परंपरागत स्वरुपाची असल्याने त्यातून मिळणारे उत्पन्न हे अल्प स्वरुपाचे आहे. आदिवासींची शेती जमिनी या गैर आदिवासी लोकांनी बळकावल्या असल्याने आदिवासी भूमिहीन झालेले आहेत.

#### (B) कर्जबाजारीपणा -

आदिम समाजातील पूर्वीची वस्तुविनिमय पद्धत जाऊन मुद्राविनिमय अर्थव्यवस्था रूढ झालेली आहे. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन व्यापारी, सावकार यांच्याकडून त्यांचे शोषण केले जात आहे. सावकार, ठेकेदार

Scanned with CamScanner

यांनी आदिवासींना कर्जाऊ रक्कम देऊन त्यावर भरमसाठ व्याज लावल्याने आदिवासी कर्जबाजारी झालेले आहेत.

(C) दारिद्र्य -

आदिवासी लोक दुर्गम भागात असल्याने त्यांचे स्वतंत्र व्यवसाय नाहीत, शेती व वनउत्पादनापासून त्यांना पुरेसे पैसे मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची अवस्था अत्यंत दयनीय स्वरुपाची आहे.

(D) जंगलविषयक कायद्याचा परिणाम -

भारत सरकारने 1952 मध्ये जंगलातील उत्पादने गोळा करणे, शिकार व स्थानांतरीत शेती करणे यावर कायद्याने बंधने घातली आहेत. त्यामुळे आदिवासींच्या जीवनानिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

(E) वेठबिगारी -

वेठबिगारी प्रथेमध्ये कर्जबाजारी आदिवासींना गुलाम म्हणून पिढ्यानपिढ्या विना मोबदला जमीनदाराच्या घरची व शेतीची कामे करावी लागतात. कायद्याने ही प्रथा बंद करण्यात आली असली तरी अजूनही काही भागात ही प्रथा सुरु आहे.

(F) शोषणाची समस्या -

जमिनदार, सावकार, ठेकेदार यांनी आदिवासींच्या जमिनी हडपणे, कमी मजूरी देणे, जास्त व्याजदर घेणे, आर्थिक फसवणूक करणे इत्यादी प्रकारे त्यांचे सतत आर्थिक शोषण केले आहे.

वरीलप्रमाणे आदिवासींना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या आहेत.

(2) आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या -

आदिवासी समाजाला काही सामाजिक व सांस्कृतिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. असा

समस्या पुढीलप्रमाणे...

(A) युवाग्रहांचा ऱ्हास -

आदिम समाजातील युवक - युवतींना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक शिक्षण देणारी युवाग्रहे होती. परंतू प्रगत समाजाशी संपर्क आल्याने, युवाग्रहांवर टिका होऊ लागल्याने आज युवाग्रहांचा ऱ्हास होऊ लागला आहे.

(B) वधूमूल्य व बालविवाहाची प्रथा -

प्रगत हिंदू समाजाच्या संपर्कामुळे आज आदिवासी समाजात वधूमूल्य व बालविवाह या प्रथा सुरु झालेल्या आहेत.

(C) अनिष्ट प्रथांना प्रारंभ -

बहुसंख्य हिंदूंच्या जीवनपध्दतीने प्रभावित होऊन आदिवासींनी हिंदूंच्या जिवनपध्दतीचा स्विकार करण्यास सुरवात केली आहे. यामधूनच आदिम समाजात अनेक अनिष्ट प्रथांचा प्रवेश झाला आहे.

(D) धर्मांतर -

ख्रिश्चन व हिंदू धर्माच्या संपर्कामुळे आदिमांच्या मूळ धर्मावर आघात होऊ लागला आहे. पैशाचे आमिष, अज्ञान यामूळे धर्मांतराचे प्रमाण वाढत चालले आहे.

(E) भाषाविषयक प्रश्न -

प्रगत समाजाच्या संपर्काने आदिवासी आपली बोली भाषा विसरत चालले आहेत. नविन भाषा त्यांना पूर्णपणे आत्मसात करता न आल्याने संपर्कामध्ये अडथळा निर्माण होत आहे.

(F) वाढती व्यसनाधिनता -

दारु, मद्यपान, तबांखू, सिगारेट, भांग, गांजा ओढणे यासारख्या व्यसनाच्या आहारी आदिम तरुण चालले आहेत. एकूणच आज आदिवासींमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढत चालले आहे.

Scanned with CamScanner

③ आदिवासींच्या शैक्षणिक समस्या -

आदिवासी समाजातील काही महत्वपूर्ण शैक्षणिक समस्या पुढीलप्रमाणे...

A दुर्गम आदिवासी भागात शिक्षणाचा अभाव आहे.
B आदिम समाजात शैक्षणिक वातावरणाचा अभाव आहे.
C आदिवासींमध्ये शिक्षणाविषयी उदासिनता आहे.
D निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.
E. शिक्षणाच्या खाजगिकरणामूळे त्यांना ते घेता येत नाही.

④ आरोग्यविषयक समस्या -

आदिवासींमध्ये वैद्यकीय उपचाराबाबत अज्ञान आहे. त्यापेक्षा त्यांचा अघोरी प्रथा, जादूटोणा, मंत्र-तंत्र यावर अधिक विश्वास आहे. कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक आहे. आजारपणाबाबत उदासिनता जास्त आहे.

सारांश -

आदिवासींच्या पंरपरागत जीवनशैलीमूळे काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. तर काही समस्या या प्रगत समाजाशी संपर्क निर्माण झाल्याने निर्माण झालेल्या आहेत. एकूणच आज भारतातील आदिवासींच्या समोर अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

— XoX — XoX —

Scanned with CamScanner

## (C) Impact of Tribal Movement :
## आदिवासी चळवळीचा प्रभाव / परिणाम :

* प्रस्तावना -

भारतात आदिवासी जमाती मोठ्या संख्येने आजही अस्तित्वात आहेत. आदिवासींना मूळचे रहिवासी, वनवासी, गिरिजन असा विविध नावांनी ओळखले जाते. डॉ. घुर्ये यांनी आदिवासींना 'मागासलेले हिंदू' असे म्हटले होते. ब्रिटिश राजवटीपासून ब्रिटिश, जमीनदार, सावकार यांनी आदिवासी यांच्यावर अन्याय अत्याचार केले. त्यामधून अनेक आदिवासी चळवळी उदयास आल्या. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते ठक्कर बाप्पा, गोदावरी परुळेकर, ताराबाई मोडक यांचे प्रयत्न विचारात घ्यावे लागतात. आदिवासी चळवळीच्या प्रभावाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक राजकीय क्षेत्रावर परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे...

1 ब्रिटिश वसाहतवादाचा परिणाम -

ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांनी जंगलविषयक धोरण निर्माण केल्याने आदिवासी समोर मोठे संकट उभे राहिले होते. त्यामधूनच अनेक आदिवासींनी याविरोधात बंड पुकारले, उदा. कोल, नागा, मुंडा, संथाळ यांचे बंड इ. आदिवासींच्या या बंडाचे रुपांतर चळवळीमध्ये झाले. या चळवळीमधून त्यांच्यात स्वाभिमानाची, आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली. स्वतंत्र राज्यांची निर्मिती झाली. उदा. नागालँड, मिझोराम, मेघालय, झारखंड इ. ब्रिटिश वसाहतवादाच्या शोषणामुळेच आदिवासी चळवळीचा उदय झाला.

2 सामिलीकरण -

डॉ. घुर्ये यांनी सामिलीकरणाचे धोरण मांडले. आदिवासींचा प्रगत समाजाशी संपर्क आल्याने त्यांना अलग, आलिप्त ठेवणे अशक्य होते. आज अनेक आदिवासी जमातींनी ग्रामीण समाजातील जीवनमान स्विकारले आहे. त्यामुळे आदिवासी जमातीत बदल घडून आलेले आहे. ... आदिवासी चळवळीचा परिणाम आहे.

Scanned with CamScanner

3 जागृती -

आदिवासी चळवळीमुळे आदिवासी लोकांमध्ये जागृती घडून येण्यास चालना मिळालेली आहे. आपले प्रश्न, समस्या या आपणच सोडवल्या पाहिजेत, तसेच आपल्याविरोधातील अन्याय - अत्याचाराविरोधात आपणच संघटितपणे आवाज उठवला पाहिजे ही जाणिव जागृती आदिवासीमध्ये सामाजिक चळवळीमुळे झाली.

४ शोषणास प्रतिबंध -

आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करणाऱ्या जमिनदार, सावकार, ठेकेदार यांच्या विरोधात आदिवासींनी हिंसक चळवळ निर्माण केला. त्यामुळे आदिवासींच्या दहशतीमुळे शोषणकर्त्यांनी आदिवासींचे शोषण करणे कमी केले. थोडक्यात, आदिम चळवळीमुळे आदिवासींच्या होणाऱ्या शोषणास प्रतिबंध झाला.

५ आदिवासी विकास -

आदिम चळवळीच्या प्रभावाने स्वातंत्र्य प्राप्तिनंतर शासनाने आदिवासींच्या विकासासाठी व कल्याणासाठी घटनात्मक तरतुदी निर्माण केलेल्या आहेत. उदा. शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण, शिक्षणविषयक सवलती व शिष्यवृत्ती, राजकीय आरक्षण, इत्यादी. परिणामी आदिवासी समाजामध्ये विकास घडून येत आहे.

६. आदिवासी समाजात आमूलाग्र परिवर्तन -

आदिवासी चळवळी या राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध प्रकारच्या आहेत. या चळवळींच्या प्रभावाने आदिवासींच्या जीवनाच्या विविध भागावर, क्षेत्रांवर प्रभाव पडला आहे. त्यामुळे आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात आमुलाग्र बदल होण्यास चालना मिळालेली आहे.

Scanned with CamScanner

७ नेतृत्वाची निर्मिती - आदिवासी चळवळीमुळे आदिवासींमध्ये नविन नेतृत्व उदयास आलेले आहेत. आदिम समाजातील परंपरागत नेतृत्व, जमातप्रमुख, पुरोहित हे नेतृत्व मागे पडत चालले आहे. त्याऐवजी नवे नेतृत्व हे सुशिक्षित व लोकशाही स्वरुपाचे असून ते आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यासाठी राजकीय प्रक्रियेचा वापर देखिल केला जात आहे.

८ आदिवासींच्या आर्थिक विकासाला चालना मिळालेली आहे.

९ आदिवासींच्यात आरोग्यविषयक जागृती निर्माण झालेली आहे.

१० आदिम समाजात शैक्षणिक विकास घडून येत नाही.

११ राजकीय प्रक्रियेमध्ये सहभाग वाढला आहे.

**सारांश -** आदिवासी चळवळींच्या प्रभावाने आदिवासी समाजात परिवर्तन घडून आलेले आहे. मात्र हे परिवर्तन केवळ आदिवासी चळवळीमुळे एकाच घटकामुळे घडले आहे असे नाही, तर यासाठी इतर अनेक घटक देखिल जबाबदार आहेत.